UCI रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप, २०३२ स्पर्धेचे यजमानपदासाठी व पुणे शहराची उमेदवारी सादर करण्यासाठी शासकीय शिष्टमंडळाच्या सहभागास व विदेश दौऱ्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः SD-१२०१८/३७/२०२६(१८१२५८३)/क्रीयुसे-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ /०८/२०२६

<u>वाचा</u> :-

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.परदौ-१४२०/प्र.क्र.२६/११, दि.०१.०२.२०२१.
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.परदौ-१४२५/प्र.क्र.९५/विचौ.१, दि.२१.०८.२०२५.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.क्रीयुसे/अभ्यास दौरा/२०२५-२६/का.१३/४६९८, दि.०३.०९.२०२५

प्रस्तावना:-

सन २०२६ मधील UCI रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धा Montréal, कॅनडा येथे दि.२० ते २७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या जागतिक स्पर्धेदरम्यान UCI शी संलग्न राष्ट्रीय सायकलिंग महासंघाचे प्रतिनिधी, UCI पदाधिकारी व आंतरराष्ट्रीय सायकलिंग क्षेत्रातील प्रमुख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. याच कालावधीत सन २०३२ मधील UCI रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप, २०३२ च्या यजमानपदासाठी UCI Congress व UCI Management Committee च्या बैठका होणार आहेत. त्यानुषंगाने, UCI रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप च्या यजमानपदासाठी पुणे शहराच्या उमेदवारीचे अधिकृत Host Candidate Presentation करण्यात येणार आहे. सदर सादरीकरणानंतर यजमानपदाबाबत UCI स्तरावर निर्णयाची प्रक्रिया लगेच होणार असल्याने Montréal येथील सादरीकरणास उपस्थित राहणे महत्त्वाचे आहे. त्यानुसार सदर शिष्टमंडळातील खालील अधिकाऱ्यांना दि.१९.०९.२०२६ ते दि.२५.०९.२०२६ या कालावधीत विदेश दौऱ्यास उपस्थित राहण्यास व याद्वारे होणा-या रु.२८.७० लक्ष इतक्या अंदाजीत खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

UCI रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप, २०३२ स्पर्धेच्या यजमानपदासाठी पुणे शहराची उमेदवारी सादर करण्याच्या अनुषंगाने Host Candidate Presentation करण्यासाठी खालील नमूद अधिका-यांना दि.१९.०९.२०२६ ते दि.२५.०९.२०२६ या कालावधीत कॅनडा (Montréal) दौ-यासाठी परवानगी देण्यात

येत आहे. तसेच यासाठी होणारा खर्च रु.२८.७० लक्ष इतक्या अंदाजीत खर्चास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१. श्री. रनजीत सिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. डॉ. राजेश देशमुख, सचिव, मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युवक कल्याण तथा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.
३. श्री. दीपक सिंगला, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. श्री. जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, पुणे

२. सदरचा खर्च "मागणी क्रमांक ई-३, २२०४- क्रीडा व युवक सेवा, १०४-क्रीडा व खेळ, (०२) क्रीडा स्पर्धा (०२) (०३) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत नोंदणीकृत क्रीडा संस्थाना सहायक अनुदान (राज्य) (२२०४-१९४३) ३१" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ मध्ये उपलब्ध अर्थसंकल्पित निधीतून भागविण्यात येईल.

३. संबंधित अधिकाऱ्यांनी सदर विदेश दौरा यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर त्या विदेश दौऱ्याचा अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.

४. संबंधित अधिकाऱ्याकडून म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कोणत्याही तरतूदींचा भंग केला जाणार नाही, याची दखल घेण्यात यावी. तसेच, सदर दौऱ्यादरम्यान कोणत्याही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेशी वास्तव्याचा खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारू नये.

५. सदर विदेश दौऱ्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात

६. सदर शासन आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ७८/२०२६, दि.२७.०८.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२७१९२८५५२४४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHITAL ANAND RAMTEKE
Date: 2026.08.27 19:30:08 +05'30'

(शितल रामटेके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५. जिल्हाधिकारी, पुणे
६. अवर सचिव (का-११), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (मुंबई/नागपूर)
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. निवड नस्ती (क्रीयुसे-२).